तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून १४ कोटी ४५ लाख रुपये मंजूर
>> पान 2
पारंपारीक आरोग्य सेवेला जोडणारी अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्था
>> पान 3
३१ मार्च पर्यंत १००% निधी खर्च करा - सीईओ गुलाबराव खरात
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



बिग बॉसबाहेर येताच अंकिताची लगीनघाई
आतील पान

**सुविचार**
कर्तव्याची दोरी नसली की मनाचा पतंग कुठेही फडफडत राहतो.


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 64 ■ गुरूवार, दि. 10 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटांचे निधन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई : अनेक दशके उद्योग क्षेत्रात कार्यरत असतानाही समाजसेवेची भावना ओतप्रेत अंगी भिनलेले ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांचे निधन झाले आहे. ते ८६ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. परंतु बुधवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने उद्योग जगतावर शोककळा पसरली आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने टाटांनी देशातच नव्हे तर जगभरात छाप सोडली.

रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर १९३६ रोजी मुंबईत झाला. टाटा १० वर्षांचे असताना, १९४८ मध्ये त्यांचे आई-वडील विभक्त झाले. त्यानंतर त्यांचे संगोपन त्यांच्या आजीने केले. आजी नवजबाई टाटा यांनीच टाटांना दत्तक घेतले. त्यांचे सुरूवातीचे शिक्षण मुंबईत झाले. पुढे बिशप कॉटन स्कूल, शिमला, नंतर कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि हार्वर्ड बिझनेस कॉलेजमधून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. रतन टाटा यांनी अमेरिकेतील दहा वर्षांच्या वास्तव्यामध्ये रेस्टॉरंटमध्ये भांडी घासण्यापासून ते लिपिकपदाच्या नोकरीपर्यंत सर्व केले.



रतन टाटा यांची कामाविषयीची प्रामाणिकता आणि धडपड पाहून जेआरडी यांनी रतन टाटांना टाटा उद्योगसमूहामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. रतन टाटा यांनी १९६१ मध्ये टाटा स्टीलमधून आपल्या उद्योग जगतातील कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. प्रचंड मेहनताच्या जोरावर टाटांनी समूहाला वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम काम केले. ज्या सालात टाटांनी समूहाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतली तो काळ भारताच्या दृष्टीने अत्यंत खडतर होता. पंतप्रधान व्ही पी सिंह आणि अर्थमंत्री मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वात भारताने खासगीकरण आणि उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर रतन टाटा यांनी टाटा समूहाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. १९९० ते २०१२ या काळात त्यांनी समूहाचे अध्यक्षपद भूषवले तसेच ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष होते.आज घडीला टाटा ग्रुपच्या ८० देशांत १०० कंपन्या आहेत आणि त्यामध्ये सव्वाचार लाख कर्मचारी आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वाहिली श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय उद्योग क्षेत्राची शान म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांचं निधन झालं आहे. ते ८६ वर्षांचे होते. रतन टाटा यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून मुंबईती ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेरीस बुधवारी रात्री उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने उद्योग जगतावर शोककळा पसरली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रतन टाटा यांच्या भेटीचे काही फोटो ट्वीट केले आहे. 'रतन टाटा हे एक दूरदर्शी उद्योजक, एक दयाळू आत्मा आणि एक विलक्षण व्यक्तीमत्व होते. त्यांनी भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित व्यावसायिक घराण्यांना स्थिर नेतृत्व प्रदान केलं. त्याच वेळी, त्यांचे योगदान बोर्डरूमच्या पलीकडे गेलं. नम्रता, दयाळूपणा आणि आपल्या समाजाला अधिक चांगले बनविण्याच्या अटूट बांधिलकीमुळे त्याने अनेक लोकांसमोर स्वत: ला प्रिय केलं. रतन टाटा यांच्या सर्वात अनोख्या पैलूंपैकी एक म्हणजे मोठी स्वप्ने पाहण्याची आणि परत देण्याची त्यांची आवड. शिक्षण, आरोग्यसेवा, स्वच्छता, प्राणी कल्याण यासारख्या अनेक कारणांमध्ये ते आघाडीवर होत' असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी भावना व्यक्त केल्या.

## आचारसंहितेपूर्वी हालचालींना वेग...

# पंधरा जातींचा ओबीसीत समावेश करण्याची केंद्राकडे शिफारस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या दीड वर्षांपासून मराठा आरक्षणाचा लढा तीव्र बनला असून दुसरीकडे धनगर समाजही एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करत आक्रमक झाला आहे. त्यामुळे, राज्य सरकारकडे राज्यातील आरक्षणाच्या मुद्द्यावर तोडगा कसा काढायचा हा प्रश्न आहे. मराठा समाजाला राज्य सरकारने १० टक्के आरक्षण लागू केलं आहे. मात्र, आम्हाला ओबीसीतूनच आरक्षण हवं असल्याचं मराठा समाज बांधवाचं म्हणणं आहे. त्यासाठी, मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा समाजाचे आंदोलन व मागणी अद्यापही सुरू आहे.

त्यातच, आता विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकींचा धडाका लावला असून महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. महाराष्ट्रातील १५ जातींची ओबीसींमध्ये समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे.

राज्य सरकारकडून इतर मागासवर्ग म्हणजेच



ओबीसींच्या यादीत नव्या जाती समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने शिफारस केलेल्या जातींचा समावेश ओबीसीमध्ये करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून केंद्रीय मागासवर्ग आयोगाकडून जातींची यादी केंद्र सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, राज्यात मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करण्याची मागणी सातत्याने केली जात असून मराठा आणि कुणबी मराठा एकच असल्याचे सांगत संपूर्ण मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली जात आहे. मात्र, यावरुन ओबीसी व मराठा असा संघर्ष निर्माण झाला आहे. ''सरकारला आरक्षण मराठा जातीला द्यायचं आहे की, मराठा समाजाला. कारण, यापूर्वीच त्यांनी मराठा समाजात सहा-सात जातींचा समावेश केला. त्यापैकी कुणबी, कुणबी-मराठा लेवा पाटील, लेवा पाटीदार, लेवा कुणबी या जाती आधीपासूनच ओबीसीमध्ये आहेत. मराठा-कुणबी, कुणबी-मराठा या दोन जातीचा २००४ मध्ये समावेश केला. सहा जाती ज्या आधीपासून ओबीसीमध्ये आहेत. त्या जातीचा मराठा समाजात समावेश करुन लोकंसख्या ३० टक्के दाखवली. त्या ३० टक्के लोकंख्येला आरक्षण देण्याची आयोगाने शिफारस केली होती. त्यांच्या शिफारशीवरुन १६ टक्के आरक्षण देण्यात आलं आहे, असं बबनराव तायवडे यांनी म्हटलं होतं.

### जातींची यादी

बडगुजर, सूर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर,रेवा गुजर, पोवार, भोयार, पवार, कपेवार, मुन्नार कपेवार, मुन्नार कापू, तेलंगा, तेलंगी, पेंतारेड्डी, रुकेकरी, लोध लोधा लोधी, डांगरी.

## भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची शक्यता!

# शरद पवारांकडून भाजपला मोठा हादरा



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत जोरदार इनकमिंग सुरु आहे. गेल्या अनेक दिवसांत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्यासाठी नेत्यांच्या रांगा लागल्या आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी जी परिस्थिती राष्ट्रवादी काँग्रेसची होती, तीच आता भारतीय जनता पक्षाची झाली आहे. निवडणुकीच्या तोंडावर दिग्गज नेते भाजपला सोडचिठ्ठी देताना दिसत आहेत. शिवाय येत्या काळात असे अनेक धक्के पाहायला मिळतील, असं म्हणत शरद पवारांनी आगामी पक्ष प्रवेशाचे संकेत दिले आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून शरद पवारांच्या राष्ट्रवादी प्रवेशाचा ओघ सुरु आहे. आता भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी असलेले संजय काकडे शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची शक्यता आहे. शरद पवारांसोबत दोनवेळा भेट झाल्याचे काकडेंनी म्हटलंय. संजय काकडे हे सध्या महाराष्ट्र प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष आहेत. त्यामुळे भाजपसाठी हा मोठा धक्का बसणार आहे.

हर्षवर्धन पाटील, समरजीत घाटगे यांच्यानंतर आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. पक्ष फुटीनंतर साथ देणारे रामराजे निंबाळकर १४ तारखेला शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची शक्यता आहे. त्यांच्यासोबत फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांचा देखील प्रवेश होण्याची शक्यता बोलली जातीये. त्यामुळे अजित पवारांना मोठा धक्का बसण्याची चिन्हे आहेत. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनीही इंदापुरात तुतारी फुंकलीये. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी हर्षवर्धन पाटलांना उमेदवारी देखील जाहीर करण्यात आलीये. इंदापूरची जागा महायुतीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सुटणार असल्याचे बोलले जात होते. आगामी विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी अखेर हर्षवर्धन पाटलांनी राष्ट्रवादीची वाट धरली. गेल्या वेळी केवळ ३ हजार मतांच्या फरकाने पराभूत झालेल्या हर्षवर्धन पाटलांना उमेदवारी देऊन शरद पवारांनी मोठी खेळी केली.

# हरियाणाच्या निकालानंतर ठाकरे फ्रन्टफूटवर, शिवसेना भवनाबाहेरची पोस्टरबाजी, मविआचं टेन्शन वाढवणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** हरियाणामधल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर २४ तासांमध्येच उद्धव ठाकरेंची शिवसेना फ्रन्टफूटवर आली आहे. सामनाच्या अग्रलेखामधून संजय राऊतांनी काँग्रेसला कानपिचक्या दिल्या आहेत. तसंच उद्धव ठाकरेंनीही पुन्हा मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्याची मागणी केली आहे. एकीकडे उद्धव ठाकरेंकडून ही मागणी केली जात असतानाच शिवसेना भवनाबाहेर लागलेले पोस्टर चर्चेचा विषय ठरत आहेत.

शिवसेना भवनाच्या बाहेर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची होर्डिंग लागली आहेत. या होर्डिंगवर उद्धव ठाकरेंचा उल्लेख भावी मुख्यमंत्री म्हणून करण्यात आला आहे. दसरा मेळाव्यानिमित्त शिवसेना भवन परिसरामध्ये हे होर्डिंग लावण्यात आले आहेत. महाराष्ट्राच्या रक्षणासाठी मनातले आणि शिवसैनिकांच्या हृदयातले भावी मुख्यमंत्री असा उल्लेख करण्यात आला आहे.

ठाकरेंची मुख्यमंत्रिपदाची मागणी

हरियाणाचे निकाल येत असतानाच उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाचा मुद्दा छेडला. महाराष्ट्र वाचवण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने



मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा. त्यांनी सुचवलेल्या नावाला आपला पाठिंबा असल्याचं उद्धव यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री पदासाठी मी पुन्हा येईन असे म्हटले नव्हते, त्यामुळे काँग्रेस-राष्ट्रवादीने नाव जाहीर केल्यास आपण त्याला पाठिंबा देणार असल्याचं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं आहे.

राऊतांनीही डिवचलं

दुसरीकडे संजय राऊतांनीही काँग्रेसला डिवचलं आहे. 'उद्धव ठाकरेंनी सांगितलं ते शंभर टक्के सत्य आहे. जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला चेहरा होता, त्यांनी त्यांना मतदान केले. हरियाणामध्येही असा चेहरा समोर आला असता तर चित्र वेगळं असतं. महाराष्ट्रातही तसे आहे, आधी निवडणुका लढायच्या आणि नंतर नेता ठरवायचा, हे लोकांच्या पचनी पडत नाही. राज्याला चेहरा कोणता आहे, हे स्पष्ट केलं पाहिजे', असं संजय राऊत म्हणाले आहेत.




# रविकांत तुपकरांनी घेतली उद्धव ठाकरे यांची भेट

## राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता : तर अनेकांचा हिरमोड

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून इच्छुकांना आमदारकीचे वेध लागले आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक पातळीपासून ते देश पातळीवर राजकीय घडामोडींना आता वेग आले आहे. सध्या जरी निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या नसल्या तरी त्या अनुषंगाने आचारसंहिता कधीही जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष आपल्या उमेदवाराचा विजय खेचून आणण्यासाठी सर्वतोपरी सज्ज झाला आहे. अशातच आता शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी महाविकास आघाडीतील एक घटक पक्ष असलेल्या शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर जाऊन भेट घेतल्याने राज्यात नव्या राजकीय समीकरणाची नांदी होण्याची शक्यता आहे. तर रविकांत तुपकर यांनी उद्धव ठाकरे यांची



भेट घेतल्याने बुलढाणा जिल्ह्यातील अनेकांचा हिरमोड झाला असून राजकीय वातावरणात कही खुशी कभी गमचे चित्र निर्माण झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या भेटीला वेगळे महत्व आले आहे. बुलढाणा विधानसभा मतदारसंघात रविकांत तुपकर यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत बुलढाणा मतदारसंघातून रविकांत तुपकर अपक्ष निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला असला तरी त्यांनी जवळपास अडीच लाख मत घेतली होती. त्यामुळे त्यांच्या पराभवाची प्रत्येक पक्षाने सुद्धा दखल घेतली.आता आगामी विधानसभा निवडणुकीत मत विभाजन आणि नुकसान टाळण्यासाठी रविकांत तुपकर यांना सोबत घेण्याच्या दृष्टिकोनातून महाविकास आघाडीत सकारात्मक चर्चा होत असल्याची माहिती आहे.

### जिल्ह्यातील सहाही जागा लढवण्याची केली होती घोषणा

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खा. राजू शेट्टी यांच्याविरोधात भूमिका घेऊन संघटनेची हानी केल्याबद्दल रविकांत तुपकर यांची हकालपट्टी करण्यात आल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून मिळाली आहे. त्यानंतर रविकांत तुपकर यांनी पुण्यात महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडीची घोषणा केली होती. तर आगामी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये रविकांत तुपकर २५ जागा लढवणार असल्याची घोषणा पुण्यातील कार्यकर्ता बैठकीत रविकांत तुपकरांनी केली होती. यामध्ये बुलडाणा जिल्ह्यात ते ६ जागा लढवणार आहेत. तर लवकरच राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करणार असल्याची माहिती त्यावेळी त्यांनी दिली होती.

### पुढाऱ्यांचा महाविकास आघाडीकडे कल

राज्याच्या राजकारणात झालेली सत्तापालट मतदारांना पचनी न पडल्याने मतदारांचा कौल उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेकडे प्रचंड प्रमाणात आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार व काँग्रेस या महाविकास आघाडीला मतदारांकडून कौल मिळत आहे . त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी ही सत्तेत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महाविकास आघाडीकडे मतदारांचा असलेला कौल लक्षात घेता राज्याच्या राजकारणातील अनेक दिग्गज पुढाऱ्यांनी महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये एन्ट्री करणे सुरू केले आहे. तर काही दिवसात पोळा फुटण्याची शक्यता ही वर्तविली जात आहे.

### तुपकरांच्या भेटीने काही खुशी कभी गम

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्याने राजकारणात खळबळ उडाली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या चर्चेने राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यात अनेकांचा मात्र हिरमोड झाला आहे.त्यामुळे सध्या कही खुशी कही गम असे चित्र असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## इस्रायल - पॅलेस्टाइन रक्तरंजित संघर्ष

इस्राईल आणि पॅलेस्टाइन यांच्यात सुरू असलेला रक्तरंजित संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. या युद्धात आता लेबनॉन आणि इराणनेही उडी घेतली आहे. इस्राईलने लेबनॉनवर तर इराणने इस्राईलवर हल्ला केला आहे. इराणने इस्राईलवर २०० हून अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने पुन्हा लेबनॉनवर हल्ला करतानाच इराणला देखील बदला घेण्याचा इशारा दिला. इराण आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्ष वर्षभरानंतरही चालूच आहे. गेले वर्षभर या दोन देशात युद्ध सुरू आहे. पॅलेस्टाईनच्या हमास या दहशतवादी संघटनेने इस्राईल मध्ये घुसून हल्ला केल्यावर इस्राईलने पॅलेस्टाईनच्या गाझा पट्टीवर हल्ला करून ती अक्षरशः जमीनदोस्त केली. या युद्धात हजारो नागरिक मारले गेले असून लाखो जखमी आहेत तरीही हा संघर्ष सुरूच आहे. इस्राईल पॅलेस्टाईन आणि लेबनॉनवर हल्ले करतच आहे. इस्राईल पॅलेस्टाईन आणि लेबनॉनच्या केवळ लष्करी किंवा दहशतवादी तळांवर हल्ले करीत नसून नागरी वस्तीवर देखील हल्ला करीत आहे. पॅलेस्टाईनच्या हमास संघटनेने देखील इस्राईलवर जो हल्ला केला होता त्यात शेकडो नागरिकांना जीव गमवावा लागला होता. पॅलेस्टाईनने अपहरण केलेल्या शेकडो इस्राईली नागरिकांना अद्यापही सोडले नाही. हा संघर्ष कमी होण्याऐवजी वाढतच चालला आहे नव्हे तो तीव्र होत चालला आहे. अर्थात हा संघर्ष आताचा नाही तर काही दशकांचा आहे. इस्राईल - पॅलेस्टाइन यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने जग दोन भागात विभागले गेले आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रांससह अनेक मोठ्या राष्ट्रांनी इस्राईलची बाजू घेतली आहे तर मुस्लिम राष्ट्रे पॅलेस्टाइनच्या बाजूने उभी आहेत. भारतातही सोशल मीडियावर आय स्टँड विथ इस्राईल, आय स्टँड विथ पॅलेस्टाइन असे युद्ध रंगले आहे. इस्राईल - पॅलेस्टाइन हा संघर्ष पुन्हा उफाळून येण्यामागे धार्मिक वाद कारणीभूत आहे. जेरुसलेम हे अत्यंत प्राचीन शहर आहे. या शहरात यहुदी, ख्रिश्र्चन आणि मुस्लिम या तिन्ही धर्माच्या पवित्र धार्मिक स्थळांचा मिलाफ आहे. साहजिकच या ठिकाणी कोणताही धार्मिक वाद निर्माण झाला तर जगातील निम्म्याहून अधिक देशांवर याचा प्रभाव पडतो. जेरुसलेम या शहराची स्थापना ख्रिश्र्चन आणि मुस्लिम धर्माच्या उदयापूर्वी झाली आहे. ई स पूर्व ९३७ मध्ये यहुदी राजा सुलेमानने येथे भव्य सिनेगॉग ( यहूदिंचे पवित्र धार्मिक स्थळ ) बांधले. कालांतराने या भागावर परकीय आक्रमणे झाली. अनेक धार्मिक क्रांत्या झाल्या आणि त्यांनी सिनेगॉग च्या ठिकाणी आपल्या धर्माची प्रार्थना स्थळे उभारली. मूलनिवासी यहूदिंना तेथून हुसकावून लावले. यहुदी लोक आपली संपत्ती घरदार सोडून जगभरात मिळेल त्या ठिकाणी राहू लागले. या काळात पवित्र सिनेगॉगही नष्ट करण्यात आला. सध्या त्याची केवळ एक भिंत शिल्लक आहे तिला वेलींग वेल असे म्हणतात. यहुदी लोक तिला अत्यंत पवित्र मानतात. या भिंतीच्या पूर्व दिशेला अल अकसा मशीद आहे. मक्का आणि मदिना प्रमाणेच मुस्लिम लोक या मशिदीला पवित्र मानतात. तर याच शहरात चर्च ऑफ होली स्कप्लचर हे ख्रिश्र्चन लोकांचे पवित्र स्थान आहे. याच शहरात रोमन सम्राटाने प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवले होते. त्यामुळे हे शहर या तिन्ही प्रमुख धर्मासाठी अत्यंत पवित्र असे शहर आहे. त्यामुळे जेरुसलेमवर अधिपत्य स्थापन करणे हा तिन्ही धर्मीयांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा बनला आहे. जेरुसलेम हे शहर इस्राईल मध्ये आहे. इस्राईल हा यहुदिंचा म्हणजेच ज्यूंचा देश आहे. इस्राईल हा मध्यपूर्वेतील महत्वाचा देश असून त्याच्या आजूबाजूला सर्व मुस्लिम राष्ट्रे आहेत. जेरुसलेम शहर आमचेच असून इस्राईलने त्यावर कब्जा केला आहे असा दावा हमास या संघटनेने केला आहे. जेरुसलेमला इस्रायलपासून मुक्त करून तिथे पॅलेस्टाइन राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. तर हमास ही दहशतवादी संघटना असून तिला आमच्या देशात जागा नाही जर हमासने आमची खोड काढली तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असे इस्रायलचे धोरण आहे त्यामुळेच कित्येक दशके हा संघर्ष सुरु आहे. यावेळी मात्र या संघर्षाने उग्र स्वरूप धारण केले आहे हा संघर्ष जर लवकर मिटला नाही तर त्याची मोठी किंमत जगाला मोजावी लागेल. या संघर्षाला धार्मिक किनार असल्याने हा संघर्ष धार्मिक युद्धाचे रूप घेऊ शकतो म्हणूनच हा संघर्ष वेळीच मिटला पाहिजे त्यासाठी जगातील मोठ्या राष्ट्रांनी मध्यस्थता करायला हवी.

# तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून १४ कोटी ४५ लाख रुपये मंजूर

## आमदाराचे भाविकांमधून होत आहे कौतुक

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील ओलांडेश्वर संस्थान दुधा, पांडुरंग संस्थान देऊळगावमाळी, बगदालभ्य ऋषी संस्थान देळप आणि मल्हारी म्हाळसाकांत खंडोबा संस्थान सोनाटी या ब वर्ग प्राप्त तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार संजय रायमुलकर यांच्या अथक प्रयत्नातून राज्य शासनाने १४ कोटी ४५ लाख रुपये खर्चाच्या तीर्थस्थळे विकास प्रकल्पाला मंजुरी प्रदान केली आहे.

ग्रामविकास विभाग विभागाच्या वतीने मेहकर तालुक्यातील नोंदणीकृत ब वर्ग प्राप्त ४ तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी विविध विकासकामे व्हावीत म्हणून आमदार संजय रायमुलकर यांनी शासनाकडे प्रकल्प प्रस्ताव सादर करून त्याला मंजुरी देण्याची वेळोवेळी मागणी केली होती .सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना आता यश मिळाले असून १४ कोटी ४५ लाख रुपयांच्या तीर्थस्थाने विकास आराखड्याला शासनाने मंजुरी प्रदान केली आहे.

> महायुती सरकारने ग्रामीण भागातील भाविकांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ब वर्ग दर्जाच्या तीर्थस्थळांच्या विकासासाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने ही योजना सुरू केली.मेहकर तालुक्यातील ४ तिर्थस्थळांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,अजितदादा पवार ,ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे आभार .इतरही ठिकाणचे प्रस्ताव दिले आहेत.त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> **-संजय रायमुलकर**
> **आमदार, मेहकर**



ओलांडेश्वर संस्थान दुधा ब्रह्मपुरी येथे चार कोटी ५२ लाख ७० हजार रुपयांच्या आराखड्याला मंजुरी मिळाली असून त्यात संरक्षकभिंत दोन लाख ९६ हजार रुपये ,वाहनतळ पेव्हर ब्लॉक आणि काँक्रिटीकरण करणे २५ लाख ६९ हजार ,परिसरात पथदिवे लावणे वीस लाख, विद्युतीकरण आणि इतर कामांसाठी तीन लाख रुपये खर्चाच्या विविध कामांचा समावेश आहे. देऊळगावमाळी येथील श्री पांडुरंग संस्थान साठी दोन कोटी ५० लाख १८ हजार रुपयांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यात भोजन कक्ष ४४ लाख ६५ हजार रुपये , भक्तनिवास ५४ लाख ३४ हजार रुपये ,पोहोचरस्ता ७७ लाख ११ हजार रुपये, विद्युतीकरण आणि इतर कामांसाठी १३ लाख ८८ हजार रुपये आदींचा समावेश आहे.

बगदालभ्य ऋषी संस्थान देळप उटी येथील विकासासाठी तीन कोटी ६१ लाख ५७ हजार रुपये मंजूर झाले असून त्यात भक्तनिवास चाळीस लाख २६ हजार रुपये, पोहोच रस्ता एक कोटी ८२ लाख , पथदिवे वीस लाख ,विद्युतीकरण व इतर कामांसाठी सात लाख ४२ हजार व इ एस आर कामांसाठी २४ लाख ४७ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत . मल्हारी म्हाळसाकांत खंडोबा संस्थान सोनाटी इथल्या विकासासाठी तीन कोटी ८०लाख ६३ हजार रुपये मंजूर झाले आहेत. यात प्रसादालय दोन कोटी ३६ लाख ९५ हजार रुपये ,वाहनतळ अकरा लाख ९७ हजार रुपये ,विद्युतीकरण व इतर कामे २९लाख ६ हजार आणि इतर कामांचा यात समावेश आहे.



तालुक्यातील या चारही तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते .यात्रा महोत्सव ही साजरा होतो. या तीर्थस्थळांच्या विकासासाठी आमदार रायमुलकर यांनी या आधीही भरीव निधी उपलब्ध करून दिलेला होता. मोठ्या संख्येने या सर्व तीर्थस्थळी भाविक मोठ्या संख्येने येतात. त्यांच्यासाठी विविध सुविधा निर्माण करता याव्यात म्हणून आमदार संजय रायमुलकर यांनी केंद्रीय मंत्री प्रतापरावजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाकडे विविध विकासकामांचे प्रस्ताव दाखल केले होते . ग्रामविकास विभागाचे सहसचिव का. गो. वळवी यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या ता.७ ऑक्टोबर च्या परिपत्रकात तालुक्यातील वरील १४ कोटी ४५ लाख रुपये खर्चाच्या ४ तीर्थक्षेत्र विकास प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे.

# बिग बॉसबाहेर येताच अंकिताची लगीनघाई

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बिग बॉस मराठी ५ चं पर्व संपलं. यंदाच्या सीझनमधील प्रत्येक स्पर्धकांना प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळालं. आता बिग बॉसच्या घराबाहेरही स्पर्धकांना खूप प्रेम आणि कौतुक मिळत आहे. यातील एक स्पर्धक म्हणजे कोकण हार्डेट गर्ल. या शोमुळे तिला अधिक लोकप्रियता मिळाली. याशिवाय तिने अनेकांच्या मनात घर केलं. अशातच ती सोशल मीडियावरही लोकांकडून मिळणाऱ्या प्रेमाविषयी फोटो, व्हिडीओ शेअर करत असते. बिग बॉसनंतर आता तिच्या चाहत्यांना ती लग्न कधी करणार? असे प्रश्न पडले आहेत.

अंकिता प्रभू वालावलकर लग्न कधी करणार याविषयी तिला सतत प्रश्न विचारला जात आहे. नुकतंच तिने याविषयी मौन सोडलं असून तिच्या केळवणाला सुरुवात झाली आहे. अंकिताने स्टोरी शेअर करत नवऱ्याने दिलेलं गिफ्टही दाखवलं. तिची ही स्टोरी सध्या चांगलीच चर्चेचा विषय ठरत आहे.

अंकिता वालावलकरने ती बिग बॉसमधून घरी येताच नवऱ्याने केलेल्या सेलिब्रेशनचे फोटो शेअर केले. फोटोमध्ये तिने नवऱ्याला थँक्यू म्हटलं. स्टोरीमध्ये तुम्ही पाहू शकता, अंकिताच्या सेलिब्रेशनसाठी फुग्यांचं एकदम छान डेकोरेशन आणि केक आणलेला पहायला मिळालं. पुढे अंकिताने स्टोरी टाकली ज्यामध्ये तिला तिच्या होणाऱ्या नवऱ्याने दिलेलं गिफ्ट पहायला मिळतंय. यामध्ये दोन मग आहेत त्यावर लिहिलेल आहे, Better, Together. या व्हिडीओवर अंकिताने लिहिलंय, केळवणाला सुरुवात.

दरम्यान, अंकिता सोशल मीडियावर कोकण हार्टेड गर्ल म्हणून प्रसिद्ध होतीच मात्र आता बिग बॉस नंतर तू महाराष्ट्र हार्टेड गर्ल झाली आहेस. राज्यभरातील जनतेनं तिला खूप सारं प्रेम दाखवलं त्यामुळे ती बिग बॉसच्या टॉप ५ पर्यंत पोहोचली.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त धावणार विशेष ट्रेन! २५ स्थानकांवर थांबेल

**सोलापूर/प्रतिनिधी :** दरवर्षी १४ ऑक्टोबरला किंवा विजयादशमीच्या दिवशी 'धम्मचक्र प्रवर्तन' दिन साजरा केला जातो. हा बौद्ध धर्मीयांचा एक महत्त्वाचा सण आहे. १४ ऑक्टोबर १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर आपल्या ५ लाखांपेक्षा जास्त अनुयायांसोबत बौद्ध धर्म स्वीकारला होता. हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्तानं दरवर्षी लाखो अनुयायी नागपुरात दाखल होतात.

अनुयायांची कुठलीही गैरसोय होऊ नये याची प्रशासनाकडून चोख काळजी घेतली जाते. यंदा मध्य रेल्वेकडून सोलापूर ते नागपूर मार्गावर विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. याबाबत सोलापूर रेल्वे विभागानं सविस्तर माहिती दिली आहे. दरम्यान, यंदा १२ ऑक्टोबरला विजयादशमी अर्थात दसरा आहे.

सोलापूर-नागपूर आरक्षित विशेष एक्सप्रेस!

गाडी क्र. ०१०२९ विशेष दि. ११.१०.२०२४ रोजी सोलापूरहून संध्याकाळी ६ वाजता सुटेल आणि नागपूरला दुसऱ्या दिवशी दुपारी १२.४५ वाजता पोहोचेल. २ तृतीय श्रेणी वातानुकूलित, ८ शयनयान, ६ जनरल, २ गार्ड्स ब्रेक व्हॅन अशी या गाडीची रचना असेल.

ही गाडी सोलापूर, कुर्डुवाडी, दौंड, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, चांदूर, धामणगाव, पुलगाव, वर्धा, सेवाग्राम, सिंदी, अजनी आणि नागपूर या स्थानकांवर थांबेल. http://www.enquiry.indianrail.gov.in या वेबसाइटवर आपण विशेष गाड्यांबाबत माहिती मिळवू शकता. दरम्यान, प्रवाशांनी या विशेष रेल्वे सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आलेय.

# नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे पंतप्रधानाच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन

## आमदार संजय गायकवाड व श्वेता महाले यांची उपस्थिती








**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** हतेळी येथे नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह उद्घाटन दुरदृश्य प्रणालीव्दारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झाले. आमदार संजय गायकवाड व श्र्वेता महाले यावेळी उपस्थित होते. जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या गरिब, गरजू विद्यार्थ्यांसाठी महत्वाची घटना असल्याचे मनोगत यावेळी व्यक्त केली.

जिल्हा स्त्री रुग्णालय धाड रोड येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक प्रशांत पाटील आदि उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, नव्याने निर्माण होणारे वैद्यकीय महाविद्यालये लाखो परिवारांचे सेवेचे केंद्र ठरणार आहे. या केवळ संस्था ठरणार नसून असंख्य परिवारांचे जीवन घडविण्याचा यज्ञ आहे. नव्या वैद्यकीय महाविद्यालयांमुळे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या ९०० जागा निर्माण होणार आहेत. त्यामुळे आता राज्यभरात सहा हजार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा उपलब्ध होतील. यामुळे दुर्गम भागात नव्या संधीची दालने उपलब्ध होतील. आयुष्मान कार्डच्या माध्यमातून लाखो परिवारांना मोफत उपचार, तर जनऔषधी केंद्रातून स्वस्तात औषधे मिळत आहे. कर कमी करून हृदयरोग आणि कॅन्सरवरील औषधोपचाराचा खर्च कमी करण्यात आला आहे. या माध्यमातून गरीब कुटुंबांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे.

प्रत्येक नागरिकाला माफक दरात उच्च प्रतीची आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. केंद्र व राज्य शासनाने वैद्यकीय महाविद्यालयांकडे विशेष लक्ष देऊन नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, तसेच वैद्यकीय अधिकारी निर्माण व्हावेत यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. यामुळे राज्यात दहा नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच आता येथे प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून म्हणजेच मराठीतून वैद्यकीय शिक्षण घेता येणार आहे. यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. आता ग्रामीण भागातील विद्यार्थीही वैद्यकीय शिक्षणात अग्रक्रमी राहतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार स्वेता महाले म्हणाले की, अनेक वर्षापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मागणीचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे आनंद होत आहे. वैद्यकीय शिक्षण घेण्याऱ्या जिल्ह्यातील गरजू, गरिब विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक घटना असून डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करता येणार आहे.यामुळे वेळ, खर्चाची बचत होणार असून स्थानिकांना याचा लाभ होणार आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासनाच्या प्रयत्नामुळे शासनाने वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले असून आज त्यांचे लोकार्पण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रलंबित असलेले कामे शासन वेगाने मार्गी लावत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार संजय गायकवाड म्हणाले की, यापूर्वी जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येण्याठी शर्तीचे प्रयत्न झाले आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधीच्या पाठपुरावामुळेच महाविद्यालयाची स्वप्नपूर्ती झाली आहे. यांचा मला अभिमान आहे. दुर्धर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया यांसाठी आता जिल्हा बाहेर जाण्याची आवश्यकता राहणार नाही. यामुळे जिल्ह्यातील गोरगरीबांना मोठा फायदा होणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून उच्च गुणवत्तेचे वैद्यकीय शिक्षण व अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये आपले भविष्य घडविणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून यशस्वी वाटचाल करता येणार आहे. यावेळी आपल्या मनोगतातून त्यांनी शासकीय महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांविषयी थोडक्यात विवेचन केले.

कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविकातून अधिष्ठाता डॉ. कैलास झिने यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालया विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रणजितसिंग राजपूर यांनी केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पारंपारीक आरोग्य सेवेला जोडणारी अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्था - केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :आधुनिक संशोधन आणि आरोग्य सेवेशी पारंपारीक पध्दतीने जोडणारे उत्कृष्ठ केंद्र म्हणून अखिल भारतीय आयुर्वेदीक संस्था (-खख-) अखिल भारतील आयुर्वेदिक संस्था महत्वाची भूमिका बजावीत आहे असे प्रतिपादन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

अखिल भारतीय आयुर्वेदीक संस्थेच्या आठव्या स्थापना दिनां निमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन आज ०९ ऑक्टोंबरला नवी दिल्ली येथे करण्यात आले होते त्यानिमित्त मार्गदर्शन करतांना केंद्रीय आयुषमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मु, उपराज्यपाल विनयकुमार सक्सेना या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमा दरम्यान केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मु यांना प्राचीन आयुर्वेद संदर्भांतील प्रतिमा भेट दिली.



यावेळी बोलतांना केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, गेल्या आठ वर्षात अखिल भारतील आयुर्वेदिक संस्थेने जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, प्रगत शैक्षणिक कार्यक्रम आणि उपचारात्मक पध्दतीव्दारे आयुर्वेदाचा प्रचार प्रसारात महत्वाची भूमिका बजावली आहे.

प्राचिन काळातील भारताचा आयुर्वेदीक वारसा हा सातासमुद्रा पलिकडे पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन अखिल भारतील आयुर्वेदिक संस्था भूमिका ही महत्वपुर्ण ठरली आहे.



अखिल भारतीय आयुर्वेदीक संस्थान तर्फे आठव्या स्थापना दिना निमीत्त आयेजित कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे आरोग्य संचालक सोहम वायाळ ही उपस्थित होते.

या कार्यक्रमानंतर अखिल भारतीय आयुर्वेदीक संस्थानच्या जनऔषधी केंद्राचा लोकार्पण केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या जनऔषधी केंद्राच्या माध्यमातुन कमी दरात आणि सुलभ रित्या सर्वसामान्यांना औषध उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त...


### बोरिवलीतील सुप्रसिद्ध नवरात्री मध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपस्थिती लावली



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील बोरिवलीतील सुप्रसिद्ध नवरात्री मध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपस्थिती लावली ज्यामध्ये पहिली आरती करून गर्भाची सुरुवात करण्यात आली मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी खेळण्या साठी आलेले नागरिकांना शुभेच्छा देण्यात आली.

### उद्याच्या येक नंबर चित्रपटाचा शो मनसेकडून मोफत



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** उद्या प्रदर्शित होणारा येक नंबर हा मराठी चित्रपट मराठी माणसाला पाहता यावा यासाठी मनसेने विशेष पुढाकार घेतला आहे. मनसेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष संदिप ठाकुर यांनी पेण येथील मोरेश्र्वर चित्रमंदिर मध्ये ही संधी उपलब्ध करून दिली आहे.यासाठी रसिक प्रेक्षकांना हा चित्रपट मोफत पाहता येणारं आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आणि येक नंबर हा मराठी चित्रपट प्रदर्शित होत असल्याच्या निमीत्ताने मनसेकडून रायगड जिल्हयातील संपुर्ण थेटरच उद्या सगळ्यांना मोफत पाहण्यासाठी बुकिंग केला आहे. असाच प्रयोग पेण शहरांतील मोरेश्र्वर चित्रमंदिर पेण मध्ये मराठी चित्रपटाचे दोन शो दाखऊन केला जाणार आह. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठी माणसासाठी अनोखी संधी उपलब्द करून दिलीय. तर पाच प्रेक्षकांना लकी ड्रॉ ची पाच आकर्षक बक्षिसे देखील दिली जाणार आहेत.

### मोदींच्या बाजूने एक वर्ग सायलेंट वोटर बनलेला आहे - रावसाहेब दानवे



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मोदींच्या बाजूने एक वर्ग सायलेंट वोटर बनलेला आहे.त्यामुळे हरियाणात भाजपला चांगलं यश मिळाल्याची प्रतिक्रिया रावसाहेब दानवे यांनी दिलीय. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने जालन्यातील वैद्यकीय महाविद्यालयाचं उदघाटन झालं त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. हरियाणापेक्षा वेगळा निकाल महाराष्ट्रात लागणार नाही असं सांगत महाविकास आघाडीच्या लोकांनी मुख्यमंत्री पदाच स्वप्न रंगू नये असा इशारा देखील रावसाहेब दानवे यांनी दिलाय. जम्मू काश्मीर मध्ये भाजपला चांगलं यश मिळालं,तिथली परिस्थिती वेगळी होती असा दावाही दानवे यांनी केलाय.

### ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा ओबीसी मेळावा संप्पन्न



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :**ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांची आज ९ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय क्लब हदगाव येथे सकाळी ११ वाजता जाहीर सभेचे आयोजित करण्यात आले होते. तरी ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी विचार आजच्या ओबीसी, एसी, एसटी भवितव्याचा तुमच्या आमच्या अस्तित्वाचा जातीनिहाय जनगणना करणे मराठा व इतर कोणत्याच जातीचा नव्याने ओबीसी मध्ये समावेश करू नये महाराष्ट्र सरकारने मागील सप्टेंबर २०२३ पासून दिलेली सर्वच खोटे ५८ लाख कुणबी प्रमाणपत्र रद्द करावे सगे सोयरे आदेश रद्द करावा २०२३ पासून खोट्या कुणबी प्रमाणपत्रावर नौकरी करीत असलेल्यांना नोकरीवरून कमी करून टाका, खोटे पुरावे सादर करणाऱ्यावर गुन्हे दाखल करा अशा विविध मागण्यासाठी ओबीसी समाजाच्या वतीने जनजागरण मोहीम सुरू करण्यात येत आहे त्याचाच एक भाग म्हणून प्रा. लक्ष्मण हाके यांना हदगाव येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# सरपंच चंदाबाई गुलमोहर यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना व राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने बिबि गावातील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन काम करणाऱ्या आणी आपल्या समर्थ नेतृत्वाने गावाचे विविध प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी सदैव कार्यरत राहणाऱ्या बिबी ग्रामपंचायतच्या सरपंच श्रीमती चंदाबाई उत्तमराव गुलमोहर यांना आदर्श सरपंच पुरस्कार २०२४ चा जाहीर करण्यात आला यावेळी सरपंच ताई यांना गावकऱ्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला या वेळी सरपंच ताई आदर्श सरपंच पुरस्कार चे श्रेय हे बिबी वासीयांना देत आहे यावेळी गावातील नागरिक संतोष बनकर, रियाज भाई, संदीप खुळे, श्रीमत आटोळे, कृष्णा पंधे, कैलास मोरे, बंडू इवरे, विजय बनकर, राठोड,सह अनेक जन उपस्थित होते

# सातव्या नळी दिनी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीची शेषशाही अलंकार महापूजा



दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** शारदीय नवरात्र महोत्सवात आज ०९ ऑक्टोबर रोजी बुधवारी सातव्या माळेच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवीजींची शेषशाही अलंकार महापूजा मांडण्यात आली.

श्री तुळजाभवानी देवीजींच्या आज नित्योपचार पुजा आणि अभिषेक पूजेनंतर शेषशाही अलंकार महापूजा मांडण्यात आली.या दिवसाचे महत्व म्हणजे भगवान विष्णू क्षिरसागरामध्ये शेष शैयावरती विश्राम घेत असताना मातेने त्यांचे नेत्र कमलात जावून विश्राम घेतला. यावेळी भगवान विष्णू यांच्या दोन्ही कानातून निघालेल्या मला(मळ) पासून दोन दैत्य उत्पन्न झाले.त्यांची नावे शुंभ व निशुंभ आहेत.ते उत्पन्न होताच शेष शैयावरील विष्णूवरती आक्रमण करण्यास जाऊ लागले. त्यावेळी नाभी कमलात विराजमान असलेल्या ब्रम्हदेव यांनीविष्णूच्या नेत्र कमलात विश्राम घेणाऱ्या देवीची स्तूती करुन देवीला जागविले व विष्णूवरती आक्रमण करणाऱ्या दैत्यांचा वध श्री तुळजाभवानीमातेने केला म्हणून विष्णूने आपले शेष शैया देवीला विश्राम करण्यासाठी दिले.त्यामुळे ही शेषशाही अलंकार महापूजा मांडण्यात येते.अशी आख्यायिका सांगितली जाते.

# आम आदमी पार्टी नेते धनंजय रामकृष्ण शिंदे यांचा आझाद मैदान येथे आक्रोश मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आम आदमी पार्टी नेते धनंजय रामकृष्ण शिंदे यांनी (राज्य उपाध्यक्ष) आझाद मैदान येथे आक्रोश मोर्चा काढला आहे. भारत हा तरुणांचा देश आहे पण तरुणांना रोजगार नाही. राज्यातील बेरोजगारांच्या विविध मागण्यांसाठी राज्य शासनाशी गेल्या अनेक महिन्यांसाठी पाठपुरावा करत असून त्यांचे प्रश्र्न सुटलेले नाहीत. पुढील काही दिवसांत आचार संहिता लागल्यास नवीन सरकार बनेपर्यंत हे प्रश्र्न अधांतरीत राहतील म्हणून या तरुण तरूणींमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. या मोर्चात आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी कोविड च्या काळात स्वतःचे शीर तळहातावर घेऊन लढलेले कोविड योद्धे असतील, त्याचप्रमाणे आरोग्य सेवक परीक्षा मेरिट मध्ये उत्तीर्ण होऊनही अपात्र ठरलेल्या महिला व पुरुष परिचारिका, MPSC मार्फत आगामी राज्यसेवा आणि कम्बाईन गट ब व क परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, BMC च्या आगामी भरतीमध्ये स्थान मिळावे म्हणून प्रकल्पग्रस्त, १२५०० आदिवासी समाजाच्या जागा राज्य सरकारने भराव्यात अशी मागणी ते करत आहे. त्यांच्या मागण्या सरकारच्या चौकटीत बसणाऱ्या असल्यामुळे त्या मान्य व्हायला हवा अशी इच्छा देखील आम आदमी पार्टी नेते धनंजय रामकृष्ण शिंदे यांनी व्यक्त केली आहे.




# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; ३२ लाख रुपयांचा मुद्देमात जप्त

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** संभाजीनगरच्या सावंगी येथील समृद्धी महामार्गाच्या उड्डाणपुलाजवळ एका कारमध्ये ६ गोण्यात ८७ किलो १०० ग्रॅम आफूचे बोंडे घेऊन जात असताना संभाजीनगर स्थानिक गुन्हे शाखेने गाडी थांबवून राजस्थान येथील आरोपी ओम प्रकाश भागीरथराम बिश्र्नोई याला ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातून ३१ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केलाय.स्थानिक गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, सावंगी शिवारात, छत्रपती संभाजीनगर ते सिल्लोड रोडवर समृध्दी महामार्गाचे पुलाजवळुन एक व्यक्ती पांढ-या रंगाच्या ब्रीझा गाडी क्रमांक 21 BH5977 - या मध्ये अफुच्या बोंडाच्या गोण्या स्वत: आर्थिक फायद्याकरिता विक्री करण्याच्या उद्देशाने घेवुन जाणार आहे, स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर ते सिल्लोड जाणारे रोडवर मौजे सावंगी शिवारात, समृध्दी महामार्गाचे पुलाजवळ पुर्व नियोजित सापळा रचुन मिळालेल्या माहिती नुसार पांढ-या रंगाची ब्रीझा गाडी क्रमांक २१ इक५९७७ - हि येत असतांना दिसल्याने सर्व अधिकारी व अंमलदार व सोबतचे एनडीपीएस कार्यवाई पथक असे सर्वांनी संशयीत वाहनास थांबवुन गाडीची झडती घेतली असता त्यामध्ये अफुची बोंडे असलेल्या सहा गोण्या मिळुन आल्या. त्यास अधिक विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव ओमप्रकाश भागीरथराम बिष्णोई वय २४ वर्षे रा. नगर ता. गुडामालाणी जि. बाडमेर राज्य राजस्थान असे सांगीतले. त्यानुसार खात्री झाल्याने मिळुन आलेल्या अफुची बोंडे यांचा सविस्तर पंचानामा केला असता एकुण सहा गोण्यात ८७ किलो १०० ग्रॅम वजनाची अफुची बोंडे, व ब्रिझा कार व ईतर साहित्य असा एकुण ३१,९७,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने सर्व कायदेशीर प्रक्रिया करुन जप्त करण्यात आला. नमुद इसमास मिळुन आलेल्या मुद्देमालासह पोलीस ठाणे फुलंब्री येथे हजर करुन एनडीपीएस कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास सपोनि संभाजी वडते, पोस्टे फुलंब्री हे करित आहे.



# ३१ मार्च पर्यंत १००% निधी खर्च करा - सीईओ गुलाबराव खरात

## आठवडाभरातील सभेचा प्रभाव ४५० कामे सुरू






दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद येथे नवीन रूजू झालेले मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी तालुका स्तरावर जाऊन ग्रामपंचायत अधिकारी, तालुक्याचे अधिकारी यांना कामाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्याचा धडाका सुरू केलेला आहे. २६ सप्टेंबर पासून त्यांनी तालुकास्तरीय सभेला सुरुवात केली असून त्याचे फलीत म्हणजे सुमारे ४५० कामे सुरू झालेले आहेत. ३१ मार्च पर्यंत सर्व उपलब्ध निधी खर्च करण्याचे सक्त निर्देश त्यांनी या सर्व सभांमध्ये दिले आहेत. आज पंचायत समिती लोणार आणि मेहकर येथील सभा संपन्न झाल्या. यादरम्यान त्यांनी अपंगांबाबत अत्यंत हळहळ व्यक्त करून तात्काळ सर्व अपंग लाभार्थ्यांना योजनेचा तात्काळ लाभ देण्याचे सक्त निर्देश ग्रामपंचायत अधिकारी यांना दिले आहे.

जिल्हा परिषदचा पदभार स्वीकारल्यानंतर आपण सर्वच योजनांमध्ये अग्रस्थानी राहावे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अहोरात्र मेहनत घेत आहेत. तसेच त्यांना तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावरून ही तेवढेच सहकार्य मिळण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. त्यासाठी ते प्रत्येक तालुक्यामध्ये सभा घेत आहे. आज लोणार आणि मेहकर येथील ग्रामपंचायत अधिकारी व तालुकास्तरीय अधिकारी कर्मचारी यांची सभा घेऊन त्यांनी उपलब्ध निधी ३१ मार्चपर्यंत १००% खर्च करण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. अखर्चित निधीबाबत त्यानी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे व तो खर्च करण्यासाठीचे सूक्ष्म नियोजन करून दिले आहे. सर्व आळस झटकून टाकून कामाला लागण्याचे सुचित केले आहे.

२६ सप्टेंबर पासून सुरू केलेल्या सभांमुळे आज विविध विभागाच्या सुमारे ४५० पेक्षा अधिक कामे सुरू झालेली आहे. ज्या कामांना स्थानिक राजकारणामुळे व अंतर्गत कलहामुळे अडचणी येत आहेत त्यामध्ये ग्रामसभा घेऊन त्या समस्या सोडवण्याचे आवाहन याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले आहे. तसेच अपंगांबाबत त्यांनी अत्यंत हळहळ व्यक्त केली आहे. हे अत्यंत पुण्याचा काम आहे. हे काम दोन दिवसात संपवण्याचे आवाहन संबंधित यंत्रणेला दिले आहे. त्यासाठी एक किंवा दोन कॅम्प लावून त्यांना द्यावयाच्या योजनेचा लाभ तात्काळ देण्याबाबत निर्देशित केले आहे. तसेच घरकुलाच्या बाबतीतही लोकांना लाभ देण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. स्वच्छ भारत मिशनच्या कामातही वेग वाढवण्याचे निर्देश याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेले आहेत. सर्व कामे व्यवस्थित व्हावेत यासाठी सर्व शासकीय यंत्रणाचा समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचवलेली कामे शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय असणे प्रत्येक गावात विविध विभागाच्या योजनेच्या ऍक्टिव्हिटी सुरू असणे त्याची प्रचार प्रसिद्धी करणे कुठल्याही गावामध्ये प्लास्टिक कचरा डम्प होणार नाही याची काळजी घेणे. त्याचे व्यवस्थित विलगीकरण होईल याची काळजी घेणे गावाची स्वच्छता राखणे वेळोवेळी पाणी तपासणी करणे, साथीच्या आजारांना कोणी बळी पडणार नाही याची काळजी घेणे सरकारी कर्मचाऱ्यांचा एकमेकात समन्वय असणे

गावात अनेक अपंग लाभार्थी आहेत. आपल्याकडे येऊन त्यांनी आपल्याकडे लाभाची मागणी कराव्यात अशी अपेक्षा न ठेवता ग्रामपंचायत अधिकारी यांनी स्वतः हून त्यांच्यापर्यंत पोहोचावे. येत्या दोन दिवसांमध्ये त्यांना सर्व योजनांचा लाभ द्यावा व यासाठी गाव स्तरावर एक किंवा दोन आवश्यकतेनुसार कॅम्पचे आयोजन करावे. तसेच ज्यांना अद्यापही घरकुल दिले नाही. त्यांना तात्काळ घरकुल उपलब्ध करून द्यावे. ज्यांच्याकडे घरकुलासाठी जागा नाही त्या गावांमध्ये ५०० मीटर च्या आतील परिसरामध्ये जे शेतकरी शासकीय दराने जागा देण्यास तयार असेल किंवा दान देण्यास तयार असेल त्या जागा वर लाभार्थ्यांना घरकुल तयार करून द्यावे. तसेच गाव स्वच्छ सुंदर ठेवावे, प्लास्टिक कचरा व्यवस्थित विलगीकरण करावा – गुलाबराव खरात. या सभांना जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग संजय इंगळे, तसेच तालुक्याचे गट विकास अधिकारी उमेश देशमुख आदी उपस्थित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### हरियाणा विधानसभा विजयाचा बुलढाण्यात जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा येथे बुलढाणा जिल्हा भाजपाच्या वतीने हरियाणा विधानसभा येथे भाजपाला मिळालेल्या विजयाचे फटाके फोडुन व मिठाई वाटून जल्लोष साजरा करणयात आला, यांप्रसंगी भाजपा बुलढाणा जिल्हाध्यक्ष मा.डॉ. गणेशजी मांटे, तालुकाध्यक्ष संजय मुंढे, जिल्हाउपाध्यक्ष धर्मराज हनुमंते, यादवराव भालेराव सर, भाजपा शहराध्यक्ष संजय तिडके, जिल्हा सचिव डॉ. शंकर तलबे, आय टी सेल जिल्हा संयोजक ,सुजित गुंडे, राजेश भुतडा, श्रीराम बर्डे, सुधाकर जयभाये, प्रा.गबाजी कुटे, शाम बनकर, प्रभाकर खांडेभराड, अल्पसंख्याक आघाडीचे कय्युम टेलर, तसेच युवा मोर्चाचे गावंडे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### द्वेषाचे राजकारण करणाऱ्यांचे डिपॉझिट जप्त करुन राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आणा - कुणाल चौधरी



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी हे देशातील शोषित आणि वंचितांवर होत असलेल्या अन्याय विरोधात नेहमीच सदनासह देशभरात आवाज उचलतात यामुळे काही कट्टरवादी लोक त्यांचा सतत द्वेष करतात. नुकतेच बुलढाणा येथील एका आमदाराने त्यांची जीभ छाटण्याची भाषा वापरली होती. अशा बेताल वक्तव्य करणाऱ्या आमदारांचे निवडणुकीमध्ये डिपॉझिट जप्त करून राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आणा असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव तथा विधानसभा निवडणुकीचे प्रभारी कुणाल चौधरी यांनी केले. बुलढाणा जिल्ह्यातील खामगावात माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी आयोजित केलेल्या संयुक्त मेळाव्यात ते बोलत होते.

### शरद पवार उमेदवार आयात का करतायत? अजितदादांचा काकांवर पहिला वार!

**पिंपरी चिंचवड/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जोरदार इनकमिंग सुरू आहे. शरद पवारांच्या पक्षात होणाऱ्या या प्रवेशांबाबत अजित पवारांनी टोला हाणला आहे. ज्यांच्या पक्षात इलेक्टिव्ह मेरिट असलेले उमेदवार नसतात ते दुसऱ्या पक्षातील उमेदवार आपल्या पक्षात आयात करत असतात, असं म्हणत अजित पवारांनी नाव न घेता शरद पवारांना टोला लगावला आहे.निवडणुकीपूर्वी बरेच इच्छुक उमेदवार वेगवेगळ्या पक्षात प्रवेश करत असतात. एखाद्या इच्छुक उमेदवाराला वाटलं की ही जागा आपल्या पक्षाला सुटणार नाही, तर त्यावेळेस ते उमेदवार इतर पक्षांचे दरवाजे ठोठावतात. यापूर्वीच्या निवडणुकीमध्येही असं झालं आहे, असं म्हणत अजित पवारांनी आपल्या पक्षातील बंडखोरीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

# दोन महिलांना भगरीतून विषबाधा; बीबी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** जिल्ह्यात भगरीतून विषबाधा होत असल्याच्या घटना वारंवार घडत असताना जवळका व राहेरी बु.येथील दोन महिलांना भगर खाल्लयाने विषबाधा झाली. ही घटना दि.९ ऑक्टोबर रोजी पोटात दुखणे, उलटी ,मळमळ झाल्याने त्यांना तात्काळ बेबी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले सध्या त्यांची प्रकृती ठीक आहे. बीबीपासून दहा किलोमीटर अंतर असलेले जवळका व राहेरी बु.येथील शारदा संतोष साळवे रा. जवळका, व लता विठ्ठल देशमुख रा. राहेरी बु. या महिलांनी उपवासासाठी भगर आणून त्या भगरीच्या पिठाची भाकरी केल्या व शेतात शेती काम करण्यासाठी गेल्या असता दुपारचे जेवणावेळी भगरीची भाकर खाल्ली व त्यांना लगेच काही वेळात पोटात दुखणे, मळमळ, उलटी अशी लक्षणे दिसून आली. त्यांनी तात्काळ बीबी ग्रामीण रुग्णालयात उपचारा करता दाखल केले.यावेळी रुग्णालयातील डॉ. शरद कुहीटे वैद्यकीय अधिकारी व मीना गोंड नर्स यांनी भगरीतून विषबाधा झालेल्या महिलांवर उपचार सुरु केले. त्यांना भरती करून घेतले असून सध्या त्यांची प्रकृती ठीक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

उपवासात भगर ऐवजी फळे खावे: डॉ. कुहिटे नवरात्र उत्सव असल्यामुळे महिला, पुरुष दिवसभर उपवास धरतात. मात्र उपवासात भगर न खाता त्या भगरी ऐवजी फळ फ्रुट खावेत. अशी प्रतिक्रिया ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शरद कुहिटे दिली.

### वंचित बहुजन आघाडी दुसरी उमेदवारांची यादी जाहीर मलकापूर मतदारसंघासाठी शहेजाद खान यांचे नाव जाहीर




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र मध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरुवात झाली असून वंचित बहुजन आघाडीने दुसरी यादी जाहीर केली आहे ..या यादीमध्ये १० उमेदवारांची नावे जाहीर केली आहे. यावेळी यादीमध्ये सर्व उमेदवार हे अल्पसंख्यांक असून वंचित बहुजन आघाडीचे सर्वे सर्वा बाळासाहेब आंबेडकरांनी मुस्लिम समाजाला न्याय दिला आहे..मलकापूर मतदारसंघासाठी शहजाद खान यांचे नाव जाहीर केले असून खान यांचे स्वागत केले आहे.तर राज्यामध्ये फोडा फोडीच्या राजकारणाला जनता कंटाळलेली आहे.. त्यामुळेच मी ही निवडणूक निवडून येणार तर आहेच शिवाय राज्यातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार देखील निवडून येतील अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शहेजाद खान यांनी दिली आहे.

### वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला साडेतीन लाखांची लाच स्वीकारताना अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** जामीन मिळवून देण्यास मदत करण्यासाठी साडेतीनलाख रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली नवी मुंबईतील एन.आर.आर. पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) बुधवारी अटक केली. एसीबीच्या मुंबई विभागाने ही कारवाई केली. एसीबीने याबाबत दिलेल्या माहितीनुसार, इमारत पडल्याप्रकरणी तक्रारदारांच्या वडिलांविरूध्द नवी मुंबईतील एन. आर. आय सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात त्यांना अटक करण्यात आली होती. सध्या तक्रारदारांचे वडील तळोजा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत. त्या गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी आणि जामीन मिळवून देण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश संभाजी कदम यांनी तक्रारदारांकडे प्रथम १२ लाख रुपये व त्यानंतर २ लाख रुपयांची मागणी केली. त्यांनी ती रक्कम तक्रारदारांकडून यापूर्वीच स्वीकारली होती.

# जवान चंदू चव्हाण याचे धुळ्यात न्यायाची भीक मांगो आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** पाकिस्तानात गेलेला माजी भारतीय जवान चंदू चव्हाण यांनी आज धुळ्यात केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या विरोधात अनोखे आंदोलन केले असून चंदू चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला अभिवादन करून धुळ्यात न्यायाची भीक मांगो आंदोलन केले. त्याच्या या आंदोलनाची धुळे शहरात चांगली चर्चा रंगली होती.

यावेळी जवान चंदू चव्हाण यांनी धुळे शहरातील विविध राजकीय पक्षांच्या कार्यालयात आपल्याला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली. गेल्या अकरा वर्षांपासून मी सरकार विरोधात मला न्याय मिळावा म्हणून लढा देत आहे, मात्र मला केंद्र सरकारने किंवा राज्य सरकारने अध्याप ही शासकीय नोकरी सामावून घेतलेले नाही



किंवा मला कुठल्याही प्रकारची पेन्शन लागू करण्यात आलेली नाही. यामुळे माझ्यावर उपासमारीची वेळ आली आहे या विरोधात मी राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या विरोधात न्यायिक भीक मागून आंदोलन करीत असल्याचे त्याने यावेळी सांगितले.

# पांदन रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर शेतातील माल घरी आणावा तरी कसा

दैनिक आपला विदर्भ

■ प्रभाकर पाटील

**रिसोड :** सततच्या पावसामुळे ग्रामीण भागातील पांदण रस्त्याची दुरवस्था झाली असून शेतकऱ्यांनी आपला माल घरी आणावा तरी कसा असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांना शेतीला लागणारी यंत्रसामग्री शेती अवजारे व इतर आवश्यक साधने शेता पर्यंत नेता यावी तसेच शेतात तयार झालेला माल बाजारपेठे पर्यंत पोहोचवीण्या करिता पूर्वी असलेले कच्चे रस्ते भराव करून खडीकरण करून शासना मार्फत विविध योजनांच्या अभिसरणा मधून शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे पालकमंत्री शेत पांदन रस्ता योजना , मातोश्री पांदन रस्ता योजना अशा प्रकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून योजना राबविण्यात येत आहेत परंतु मागील दोन वर्षापासून या योजनेअंतर्गत कोणतेही काम झाले नसल्यामुळे ग्रामीण भागामध्ये शेत रस्त्यांची परिस्थिती अतिशय दैयनिय झाली आहे दोन वर्षांपूर्वी जे काही पांदण रस्ते करण्यात



आले होते निकृष्ट कामामुळे व भ्रष्टाचारामुळे ते ही पांदण रस्ते होत्याचे नव्हते झाले आहेत या रस्त्याच्या कामासाठी मनरेगा मधून खर्च केलेला निधी पाण्यात गेला आहे शासनाने २७ फेब्रुवारी २०१८ नुसार या संदर्भात शासन निर्णय जारी केला होता तसेच महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय अन्वये ग्रामीण भागातील रस्त्याची वर्गवारी केली होती या शासन निर्णयानुसार तालुक्यात काही पांदण रस्त्याची कामे करण्यात आली होती परंतु जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या सदस्यांनी ठेका घेऊन ही कामे केल्यामुळे ही कामे निकृष्ट दर्जाची झाली होती लोकप्रतिनिधीने ही कामे केल्यामुळे या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्हे निर्माण झाले होते यावर्षी सततच्या पावसामुळे ग्रामीण भागातील शेत रस्त्याची परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे पावसाने उघडीप दिली असली तरी शेत रस्ते अजूनही चिखलाने माखलेलेच आहेत त्यामुळे शेतात तयार झालेला माल घरापर्यंत आणण्याकरिता शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे लोकप्रतिनिधींनी या गंभीर बाबीकडे लक्ष द्यावे अशी मागणी शेतकरी वर्गांमधून केल्या जात आहे.